| | दुरध्वनी क्रमांक (07132) 222347 | जिल्हा परिषद, गडचिरोली<br>शिक्षण विभाग (प्राथमिक)<br>Email :- eomrygadchiroli@gmail.com |
|---|---|---|
| शिक्षण वि(प्रा.) | जा.क्र./जिपग/शिवी/खाप्राशा/ 618 /2022, | दिनांक:- 12/04/2022 |

महाराष्ट्र शासन राज पत्र असाधारण भाग चार-ब,ऑक्टोबर 11,2011/आश्विन19,शके1933

नमुना दोन

प्रती,

मुख्याध्यापक,
विद्याविहार कॉन्व्हेट नवेगाव (मुरखळा)
ता. जि.गडचिरोली.

विषय:-बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांचा कलम 18 च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2001 मधील नियम 11, पोट-नियम(4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भ:-आपले कार्यालयीन पत्र क्रमांक 06/2022 दिनांक-22/02/2022

आपल्या दिनांक 22/02/2022 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्र व्यवहार / शाळेची केलेली तपासणी च्या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली दिनांक 10/03/2022 पासून दिनांक 09/03/2025 पर्यंत तीन वर्षा च्या कालावधी साठी इयत्ता 1 ली ते 8 वी करिता विद्याविहार कॉन्व्हेट नवेगाव (मुरखळा) ता. जि.गडचिरोली (शाळेचे नांव पत्त्या सह ) शाळेस तात्पूरती मान्यता देत आहे. वरील मान्यता ही खालीलअटी व शर्ती अधीन राहुन पदान करण्यात येत आहे. :-

1 मान्यते चा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता 8 वी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल. बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम, 2009 (जोडपत्र एक ) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 (जोड पत्र दोन) मधील तरतूदी चे , शाळा पालन करील.

2 शाळा नजीक च्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना , पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादे पर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होई पर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी अस की, पूर्व माध्यमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

3 परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

4 संस्था /शाळा कोणती ही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाणनी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता/ पित्यांस किंवा पालकास भाग पाडणार नाही.

5 कोणत्या ही बालकास व याच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव , शाळे मध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

6 (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होई पर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तिन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तिर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्याचा अधिनियमाच्या तरतूदी नुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची

Vishnu
Principal
Vidya Vihar Convent High School

नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमा च्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण नकरणाऱ्या शिक्षकांनी अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ठ केलेली त्याची / तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकांने / शिक्षिकेने खाजगी शिकवणी च्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊन ये, याची सुनिश्चिती शाळा करील.

7 शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

8 शाळा, अधिनियमा च्या कलम 19 मध्ये विहित केल्या प्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तूलने त विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

9 शाळा, अधिनिय मा च्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ठ केलेल्या मानकांचे व प्रमाणकाचे पालन करीत, मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे

:- आपण सादर केलेल्या प्रस्तावानुसार

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :-43942.00 चौ.मी.
- एकूण बांधकाम क्षेत्र :-3451. 00 चौ.मी.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- 40940.00 चौ.मी.
- वर्ग खोल्यांची संख्या :-08
- कार्यालय-नि -भांडार -नि- मुख्याध्यापकाची खोली :-03
- मुलांसाठी व मुलीं साठी स्वतंत्रप्रसाधन गृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसेपाणी असेल. :-होय
- पिण्याच्या पाण्याची सुविधा :-आहे
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाक घर :-लागु नाही
- अध्यापन, अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडा विषयक सामग्री/ ग्रंथालय याची उपलब्धता :-आहे
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध :-आहे.

10 मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

11 शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

12 शाळा, सोसायटी नोंदणी अधिनिम 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थे मार्फत चालविण्यात येतआहे.

13 शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

14 शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखा परिक्षीत व प्रमाणीत करुन घ्यावेत आणि नियमा नुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत.प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कडे पाठविण्यात यावी.

15 तुमच्या शाळेला मिळालेली मान्यता संकेतांक 27120105008 असा आहे. हाया कार्यालयाशी कोणताही पत्र व्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा. याची नोंद घ्यावी.

16 शिक्षण संचालक /जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रूटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

17 संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही काम असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

18 जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

~~19 स्वच्छतागृहाची मांगणी पुर्ण करावी~~

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद गडचिरोली